**महाराष्ट्र राज्य असंघटित कामगार कल्याण महामंडळ व त्याच्या अंतर्गत ३९ आभासी मंडळे स्थापन करणे तसेच असंघटित कामगारांचे व्यवसाय/रोजगारांचे क्षेत्रनिहाय सुधारीत वर्गीकरण करण्याबाबतचे दि.०६/०७/२०२३ रोजीचे शासन निर्णय रद्द करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**शासन निर्णय, क्र.असंका-११२५/प्र.क्र.१०९/कामगार-७ अ**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- ०४ मे, २०२६.

वाचा :- १. शासन निर्णय, उद्योग,उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग क्र.असंका-११२२/प्र.क्र.४६/ कामगार-७ अ, दि.०६.०७.२०२३.
२. शासन निर्णय, उद्योग,उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग क्र.असंका-११२२/प्र.क्र.४६/ कामगार-७ अ, दि.०६.०७.२०२३.

प्रस्तावना :-

संदर्भ क्र. १ व २ येथील दि.०६.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील असंघटित कामगारांची नोंदणी, ओळख, सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ, विविध शासकीय सेवांचा सुलभ पुरवठा तसेच कल्याणकारी योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने असंघटित कामगारांचे ३९ क्षेत्रांमध्ये तसेच ३४० प्रकारच्या व्यवसायामध्ये वर्गीकरण करण्यात आले. तसेच, सदर असंघटित कामगारांसाठी क्षेत्रनिहाय स्वतंत्र ३९ आभासी मंडळे स्थापन करण्यात आली.

केंद्र शासनाने दि.२१.११.२०२५ रोजी सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० अधिसूचित केली असून, सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० कलम ६ (१) मधील तरतुदीनुसार राष्ट्रीय स्तरावर असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा मंडळ (Unorganised Workers Social Security Board) गठीत करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे.

सामाजिक सुरक्षा संहितेच्या कलम १०९ (१) तसेच कलम १०९ (२) अन्वये केंद्र व राज्य शासनामार्फत असंघटित कामगार, गिग वर्कर्स ॲण्ड प्लॅटफार्म बेस्ड वर्कर्स यांचेसाठी खालील योजना अधिसुचित करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

(1) Life and disability cover
(2) Health and Maternity benefit
(3) Old age protection
(4) Education
(5) Any other benefit as may determined by the central government.
(6) Provident fund
(7) Employment injury benefit
(8) Housing
(9) Educational schemes for children
(10) Skill upgradation of workers

(11) Funeral assistance; and
(12) old age homes

केंद्र शासनाने लागू केलेल्या सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० च्या अनुषंगाने राज्याचे नियम प्रसिध्द करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० लागू झाल्यानंतर, संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतुदी, वर्गीकरणाची पद्धत, प्रस्तावित आभासी मंडळांची आवश्यकता, प्रशासकीय संरचना, विद्यमान यंत्रणांशी सुसंगती तसेच पुनरुक्ती टाळण्याच्या दृष्टीने संदर्भाधीन शासन निर्णय रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्य असंघटित कामगार कल्याण महामंडळ व त्याच्या अंतर्गत ३९ आभासी मंडळे स्थापन करणे तसेच असंघटित कामगारांचे व्यवसाय/रोजगारांचे क्षेत्रनिहाय सुधारीत वर्गीकरण करण्याबाबतचे संदर्भाधीन शासन निर्णय या शासन निर्णयाच्या दिनांकापासून रद्द करण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या सर्व सूचना, मार्गदर्शक तत्त्वे, क्षेत्रनिहाय / व्यवसायनिहाय वर्गीकरण सूची, प्रशासकीय आदेश व अंमलबजावणी कार्यपद्धती यापुढे लागू राहणार नाहीत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेताक क्र. २०२६०५०४११५६०५७६१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SWAPNIL
YASHWANTRAO
KAPADNIS

Digitally signed by SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD,
2.5.4.20=3389518A88AF500EF17FD52858804C56D5B0DB93CE68C96
38764849614F0C8B3, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=824DB7B32ED13AAC7B6F1F11E717770B52D6784F2B
C41DDF0E4E9729CDB96F88, cn=SWAPNIL YASHWANTRAO
KAPADNIS
Date: 2026.05.04 11:57:16 +05'30'

**(स्वप्निल कापडणीस)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव (पत्राने)
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८) मा. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
९) उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०) उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

११) सर्व सन्माननीय विधानपरिषद /विधानसभा सदस्य

१२ ) मा. मुख्यसचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

१३) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई

१४) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग

१५) विकास आयुक्त (असंघटित कामगार), प्रभादेवी, मुंबई

१६) कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पुर्व), मुंबई

१७) सर्व विभागीय आयुक्त

१८) सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी

१९) सर्व सह / उपसचिव, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई

२०) सर्व अवर सचिव/कार्यासन अधिकारी, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय,मुंबई

२१) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई

२२) निवडनस्ती, कामगार-७ अ कार्यासन.